संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20

08 JUL 2025

प्राप्त झाले सही.....................

बदलीबाबत
श्री.मनेष विश्वनाथराव वाघिरकर, संचालक

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन आदेश :-संलेको-२०२५/प्र.क्र.४३/कोषा प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-७.७.२०२५.

संदर्भ :- वित्त विभाग शासन आदेश क्र.संलेको २०२५/प्र.क्र.२/कोषा प्रशा-२, दि.१४.२.२०२५

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, संचालक संवर्गातील (एस-२९ रुपये १,३१,१००-२,१६,६००/-) श्री.मनेष विश्वनाथराव वाघिरकर यांची संदर्भिय आदेशान्वये संचालक (वित्त व लेखा) आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई या पदावर दि.१४.२.२०२५ च्या आदेशान्वये पदस्थापना करण्यात आली होती. तथापि, श्री.वाघिरकर हे सदर पदावर अद्याप हजर झालेले नाहीत.

२. परंतु, श्री.वाघिरकर यांची खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्याबाबत शासन आदेश प्राप्त झाले आहेत. त्यामुळे, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ च्या नियम ४ (४) व ४ (५) मधील तरतुदीनुसार श्री.मनेष वाघिरकर यांची खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ मध्ये नमूद पदावर पदस्थापना करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदस्थापनेचे पद व कार्यालय |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १ | श्री.मनेष विश्वनाथराव वाघिरकर | संचालक (वित्त), महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मीती कंपनी मर्यादित (महानिर्मिती), मुंबई |

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्याची दक्षता घ्यावी. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

३. संबंधित अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांना अवगत करावे.

४. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तीक माहितीचा तपशिल HRMS मधील नमून्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ता. र. पवार)
अवर सचिव महाराष्ट्र शासन,

प्रत,

१. महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञयेता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई/नागपूर *
२. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (ले. व को.), यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
६. संबंधित अधिका-याचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
७. संबंधित अधिका-याचे बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख.*
८. संबंधित अधिकारी*
९. निवड नस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)